रे.दि.मु.क्र.१११/२०२४
(सुनिल विरूध्द अनंत)

## आदेश नि.८२ खाली
## (CNR No.MHRT-070013302024)
**(पारीत दि.०३/०४/२०२५)**

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ६ नियम १७ अन्वये निशाणी ४६ कडील प्रतिवादी क्र.१ च्या प्रतिवादाव्यास दिलेल्या कैफियतीमध्ये दुरुस्ती करुन मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे.

**वादीचे कथन** —

२. वादीने निशाणी ४६ कडे दाखल केलेल्या कैफियतीमधील कलम ४ मधील सातव्या ओळीमध्ये 'ती जमीन वादी व प्रतिवादी यांची सामाईक जमीन आहे' असा उल्लेख केला असून सदर वाद कथनामध्ये 'आहे' या शब्दा ऐवजी 'नाही' हा शब्द असणे आवश्यक आहे. वाद कथनामध्ये असलेला सदरचा दोष हा तांत्रिक दोष असून तो टंकलेखनामध्ये झालेल्या चुकीमुळे झालेला आहे. सबब सदर वाक्यामध्ये 'आहे' ऐवजी 'नाही' असा शब्द लिहिण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

**प्रतिवादी क्र. १ चे म्हणणे** —

३. न्यायाच्या दृष्टीने योग्य ते आदेश पारित व्हावेत.

४. अर्जाचे, म्हणण्याचे व अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५. **दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७** अन्वये दाव्याची संपरिक्षा चालू होईपर्यंत न्यायालयास योग्य वाटल्यास योग्य त्या अटी व शर्तीवरती वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

६. प्रस्तुतकामी वादमुद्दे स्थापित होऊन दाव्याची संपरिक्षा आजमितीस चालू झालेली नाही. वादीच्या कथनानुसार प्रतिवादीच्या कैफियतीमध्ये जी दुरुस्ती वादी करु इच्छित आहे ती तांत्रिक स्वरुपाची आहे. वादीने वादपत्रामध्ये नमुद केलेली इतर कथने तसेच कैफियतीमध्ये नमुद कथने देखील सदरची बाब दर्शवितात. तसेच प्रतिवादी क्र. १ तर्फे योग्य तो आदेश पारित करण्यात यावा असे म्हणणे सादर करण्यात आले आहे. सबब दाव्याची संपरिक्षा चालू झाली नसल्याने, वादी निशाणी ४६ मध्ये करु इच्छित दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असल्याने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे उचित राहील. प्रस्तुतचा अर्ज हा दाव्याच्या योग्य टप्प्यावर दाखल केला असल्याने अर्जाचा खर्च देखील वादीवर लादणे उचित राहणार नाही. सबब वर नमुद कारणांचा विचार करुन मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे—

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने निशाणी ४६ मध्ये अर्जामध्ये नमुद दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर सादर करावी.

३. अर्जाचा खर्च उभय पक्षकारांनी सोसावा.

Sd/-

दिनांक :—०३/०४/२०२५.

(मयुरेश आर. काळे)
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
चिपळूण.